# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०२/२०२५ (शुक्रवार) दुपार**

## अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. केळवद** :—फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन केळवद येथे अप क्र. ६९/२०२२ कलम ३५४(ब),३७६,३७६(एबी), ३७६ (२)(जे) भादंवि सहकलम ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता. यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी वय ८ वर्ष ही तिचे आई वडिलांसोबत गावात भागवत कार्यक्रमा साठी गेली असता तेथे तिची मैत्रीण दिसल्याने ,ती तिचे मैत्रीणीचे मागे गेली. त्यावेळी **आरोपी नामे देवा उर्फ ज्ञानेश्वर बबन पेठे वय २५ वर्ष, रा बिडगाव ,ता सावनेर जि. नागपुर** याने पीडितेला उचलून अंधारात नेवुन तिचे तोंड दाबुन तिचेवर लैगिंक अत्याचार केला. त्यानंतर पिडीतेने ओरडत पळत जाऊन तिचे वडिलांना झाला प्रकार सांगितला.पिडीतेचे आई ने दिलेल्या तक्रारीवरून वरील गुन्हा नोंद होता.

सदर प्रकरणाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती सोनाली रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश ५ श्री आर.पी.पांडे यांनी दिनांक १४/०२/२०२५ रोजी वरील नमुद **आरोपी नामे देवा उर्फ ज्ञानेश्वर बबन पेठे ,वय २५ वर्ष, रा बिडगाव ता. सावनेर ,जि नागपुर याला** सदर गुन्हयात **कलम ३७६(एबी) भादंवि मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड,दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली** आहे.सरकारचे वतीने एपीपी श्रीमती आशावरी परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा दिनेश काकडे पोस्टे केळवद यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर